सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत असलेल्या कार्यक्रम प्रमुखांच्या कार्यालयांची व अधिकारांची विभागणी करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन शुध्दीपत्रक, क्रमांकः संकीर्ण २०१६/प्र.क्र.१११/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २७ जून, २०१९.

वाचा

१) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक:पदस्था-१३१५/प्र.क्र.५०/सेवा-२ दि. ९ जानेवारी, २०१७
२) संचालक आरोग्य सेवा यांचे पत्र क्रमांक संआसे/पदनिर्माण/१८४३/टे-९/कक्ष-१/१६ दि. ५ मे, २०१६
३) संचालक आरोग्य सेवा - २ पुणे यांचे पत्र क्र.संआसे/शासननिर्णय/शुध्दीपत्रक/लघुलेखक कक्ष/३६१९ दि.१.०३.२०१९
४) शा.नि. क्र.२०१६/प्र.क्र.१११/आरोग्य ३, दि. ०६.०३.२०१९

शासन शुध्दीपत्रक:

उपरोक्त शासन निर्णय,दि. ६ मार्च, २०१९ मधील परि. २ मधील तक्त्यामधील संचालक, आरोग्य सेवा-१, मुंबई या स्तंभामध्ये अनु.क्र. समोर आरोग्य सेवा ऐवजी रुग्णालये व रुग्णालयीन सेवा, अनु. क्र. ५ समोर शुश्रुषा व इतर वैद्यकीय सेवा ऐवजी शुश्रुषा, अनु. क्र. ९ येथे राज्य रक्त संक्रमण परिषद असे वाचण्यात यावे. तसेच, संचालक, आरोग्य सेवा-२, पुणे या स्तंभामध्ये अनु. क्र. २ समोर "संसर्गजन्य रोग" ऐवजी "संसर्गजन्य रोग (कुष्ठरोग व क्षयरोग),अ. क्र. ५ समोर "आरोग्य व्यवस्थापन व माहिती यंत्रणा" ऐवजी "आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी", अ.क्र.६ समोर "वाहतूक कक्ष" ऐवजी "परिवहन" आणि अ.क्र ७ समोर "आय ई सी ब्युरो व प्रसिध्दी विषयक कार्यक्रम" ऐवजी "माहिती, शिक्षण व संपर्क" असे वाचण्यात यावे. त्यानुसार कामांचे विभाजन पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संचालक, आरोग्य सेवा (१), मुंबई | अ.क्र. | संचालक, आरोग्य सेवा (२), पुणे |
|---|---|---|---|
| १ | रुग्णालये व रुग्णालयीन सेवा | १ | प्रजनन व बाल आरोग्य |
| २ | जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवा, तसेच आश्रमशाळांमधील आरोग्यविषयक पर्यवेक्षण | २ | संसर्गजन्य रोग (कुष्ठरोग व क्षयरोग) (Air borne Diseases) |
| ३ | असंसर्गजन्य रोग | ३ | साथरोग (Vector borne Diseases) |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | मानसिक आरोग्य | ४ | दुषित पाण्याने पसरलेले साथीचे रोग (Water borne Diseases) |
| ५ | शुश्रुषा | ५ | आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी |
| ६ | औषधे, यंत्रसामुग्री व इतर खरेदी | ६ | परिवहन |
| ७ | आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ व गट -ब अधिकाऱ्यांच्या सेवा विषयक सर्व बाबी | ७ | माहिती, शिक्षण व संपर्क (Information, Education and Contact) |
| ८ | नियोजन व अर्थसंकल्प | ८ | सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा |
| ९ | राज्य रक्त संक्रमण परिषद | ९ | आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-क व गट -ड कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक सर्व बाबी |
| | | १० | प्रशिक्षण |
| | | ११ | योजनेतर अर्थसंकल्प व लेखा |

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२६१३२११५१११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.06.27 15:25:13 +05'30'

**( रो.दि.कदम पाटील)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा.मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव.
५. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. सचिव, महाराष्ट्र लाकसेवा आयोग, मुंबई.
७. महालेखापाल- १/२, (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
८. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक.

९. आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई.
१०.सर्व विभागीय आयुक्त.
११.सर्व जिल्हाधिकारी.
१२.संचालक, आरोग्य सेवा (१), मुंबई.
१३.संचालक, आरोग्य सेवा (२), पुणे.
१४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
१६.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,मुंबई/पुणे.
१७.सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई.
१८.सह संचालक,(अर्थ व प्रशासन), पुणे.
१९.सर्व उप संचालक,
२०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२१.सर्व अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालये/विभागीय संदर्भ सेवा रुग्णालये.
२२.सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालये.
२३.सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.
२४.सर्व मंत्रालयीन विभाग (सर्व विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांना व कार्यालयीन प्रमुखांना तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सदर शासन निर्णय अग्रेषित करुन अवगत करावे.)
२५.सर्व सहसचिव/उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग.
२६.निवडनस्ती (आरोग्य ३).